## . . श्री गणपतिची आरती . .

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाचि
नुरवीपुरवी प्रेम कृपा जयाची
सर्वांगी सुंदर उटि शेंदूराची
कंठी झळके माळ मुक्ता फळाची

जय देव जय देव जय मंगलमुर्ति
दर्शनमात्रे मनकामना पुरती जय देव जय देव ... धृ. .

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा
चंदनाची उटी कुंकुम केशरा
हिरेजडित मुगुट शोभतो बरा
रूणझुणती नूपुरे चरणी घागरिया ...1
. . जय देव जय देव जय मंगलमुर्ति.... .

लंबोदर पीतांबर फणिवर बंधना
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना
संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ...2
. . जय देव जय देव जय मंगलमुर्ति.... .

## देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारी
वारी वारी जन्म मरणांते वारी हारी पडलो आता संकट नीवारी

जय देवी जय देवी जय महिषासुर मथिनी सुरवर ईश्वरवरदे तारक संजिवनी . .
जय देवी जय देवी . धृ.

त्रिभुवनी भुवनी पाहता तुज ऐसी नाही चारी श्रमले परंतु न बोलवे कांही
साही विवाद करिता पडीलो प्रवाही ते तु भक्तांलागी पाविसि लवलाही ...1
. . जय देवी जय देवी जय महिषासुर.... .

प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा क्लेशांपासुनि सोडी तोडी भवपाशा
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ...2
. . जय देवी जय देवी जय महिषासुर.... .

## .. शंकराची आरती ..

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा वीषें कंठी काळा त्रिनेत्री ज्वाळा
लावण्य सुंदर मस्तकीबाळा तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा

जय देव जय देव जय श्रीशंकरा आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा
जय देव जय देव ..धृ..

कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा ...1
.. जय देव जय देव जय श्रीशंकरा... ..

देवी दैत्यी सागर मंथन पैं केले त्यामाजी अवचित हळहळ जे उठले
ते त्वां आसुरपणे प्राशन केले नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ...2
.. जय देव जय देव जय श्रीशंकरा... ..

व्यघांबर फणिवरधर सुंदर मदनारी पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी रघुकुलतिलक रामदासा अंतरी ...3
.. जय देव जय देव जय श्रीशंकरा... ..

## .. श्री दत्ताची आरती ..

त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा
नेती नेती शब्द न ये अनुमाना सुरवर मुनीजन योगी समाधिन ये ध्याना

जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता आरती ओवाळिता हरली भवचिंता
जय देव जय देव ..धृ..

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त अभाग्याशी कैंची कळेल ही मात
पराहि परतली तेथे कैंचा हेत जन्म मरणाचाहि पुरलासे अन्त...2
.. जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता... ..

दत्त येऊनिया उभा ठाकला सद्‌भावे साष्टांग प्रणिपात केला
प्रसन्न होउनि आशिर्वाद दिधला जन्म मरणाचा फेरा चुकविला...3
.. जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता... ..

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान हरपले मन झाले उन्मन
मी तूं पणाची झाली बोळवण एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान...4
.. जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता... ..

## .. विठ्ठलाची आरती ..

युगे अठ्ठाविस विटेवरी उभा वामांगी रखुमाई दिसे भव्य शोभा
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा चरणी वाहे भीमा उध्दरी जगा...1

जय देव जय देव जय पांडुरंगा रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ..
जय देव जय देव ..धृ..

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटी कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटि
देव सुरवर नित्य येती भेटी गरूड हनुमंत पुढे उभे राहती...2
.. जय देव जय देव जय पांडुरंगा... ..

धन्य वेणूनाद अणूक्षेत्रपाला सुवर्णाची कमळे वनमाळा गल
राई रखुमाई राणीया सकळा ओवळीती राज विठोबा सांवळा...3
.. जय देव जय देव जय पांडुरंगा... ..

ओवाळू आरत्या कुर्वंडया येती चंद्रभागेमाजी सोडुनिया देती
दिंडया पताका वैष्णव नाचती पंढरीचा महिमा वर्णावा किती...4
.. जय देव जय देव जय पांडुरंगा... ..

आषाढी कार्तिकी भक्तजन येती चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती
दर्शनहेळामात्रे तयां होय मुक्ती केशवासी नामदेव भावे ओवाळीती...5
.. जय देव जय देव जय पांडुरंगा... ..

## .. श्री लक्ष्मीची आरती ..

क्षितिजा क्षितिजे यज्ञे पयसागर मायिला
सिंधु प्रसवे तेरा रत्ने सहित्य तुला
त्यजुनि सुरासुर मानव ऋषिमंडल सकला
श्रीविष्णूच्या कंठी घालिसि तू माला ...1

जय जय लक्ष्मी फल सुख फल तव भजनाते
पीडा निरसुनि रक्षण करि सर्वजनाते ...धृ0

तत्पदि पुंडरिकास्तव पंढरपुरी राहे
सत्सन्निध रक्षांगी वससी तू माये
सन्मुख कान्होपात्रा हेमाश्वत्थाहे
त्वत्पूजकाकडे कधि काळ न पाहे ...जय जय लक्ष्मी...2

द्यावे सर्व जनाला सौख्य जगन्माते
निर्दाळावे जननी सर्वारिष्टाने
तू मातोश्री तुजविण प्रार्थू कवणाते
करूणा करिते श्रीहरि कान्ते सिंधुसुते ...जय जय लक्ष्मी...3

निज भक्ताला आयुष्य धेनु धन धान्य
स्त्री पुत्र पौत्र देऊनि करिसी जगमान्य
सिबिका वरण हयरय देशिल सन्मान्य
दातृत्व तुझे तुज सम कोण असे अन्य ... जय जय लक्ष्मी...4

सर्वहि दुःखे शक्ती शमती त्वन्नाभस्मरणे
यास्तव विधिरह सूरवर पूजिति सन्माने
तुझिया मंडपि होति द्विज भोजन भजने
यशवन्तात्मज भावे त्वत्पदि करि नमने ... जय जय लक्ष्मी...5

## . . श्री लक्ष्मी स्तुति . .

महालक्ष्मी नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं सुरेश्वरि
हरिप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे

## . . महालक्ष्मीची आरती . .

जय देवी जय देवी जय श्री लक्ष्मी माते
प्रसन्न होऊनि आता वर दे आम्हाते... जय देवी जय देवी धृ0

श्रीविष्णुकान्ते तव विश्वावरि सत्ता
स्थिरचर दौलत देशी लक्ष्मी व्रत करिता ...जय देवी जय देवी ... 1

जननी तुज ऐसी या नाही त्रिभुवनी
सुरवर वंदिती मस्तक ठेवुनि तव चरणी ... जय देवी जय देवी ...2

कृपा प्रसादे तुझिया लाभे सुखशांती
चिंता क्लेशहि जाती नुरते आपत्ती ... जय देवी जय देवी ...3

वैभव ऐश्वर्याचे आणि अपार द्रव्याचे
देसी दान दयाळे सदैव सौख्याचे ... जय देवी जय देवी ...4

यास्तव मिलिंद माधव आरति ओवाळी
प्रेमे भक्ति भावे लोटांगण घाली ... जय देवी जय देवी ...5

## . . प्रार्थना . .

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळयानि पाहिन रूप तुझे हे
प्रेमे आलिंगन आनंदे पूजिन भावे ओवळिन म्हणे नामा...1

त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देव देव...2

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात्
करोमि यद्यत सकलं परस्मै नारायणायति समर्पयामि...3

अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं जानकी नायकं रामचंद्रं भजे...4

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे...5

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे...6

## . . कर्पूरारती . .

कर्पूरगौरं करूणावतारं संसार सारं भुजगेंद्रहारं
सदारहासी हृदयारवंदी भवंभवानी सह तुज वंदी

## . . मंत्र पुष्पांजली . .

ॐ यज्ञेन यज्ञ महांत देवाः स्तानि धर्माणि प्रथमान्यासन्
तेहनाकम् महिमानः सचंत यत्र पूर्वेः साध्याः संति देवाः

ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे
स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु

कुबेराय वैश्रवणाय ऽ महाराजाय नमः . . ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं
पारमेष्ठयं ऽ राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समंत पर्यायी ऽ स्यात् सार्वभौमः सार्वा
युषांतादा परार्धात् . . पृथिव्यै समुद्र पर्यंतायाः ऽ एकराळिति ऽ तदप्येष श्लोकोभिगितो
मरूतः परिवेष्टारो मरूतस्या ऽ वसन् गृहे
आविक्षितस्य काम प्रे ऽ विश्वेदेवाः ऽ सभासद इति . .

इति मंत्रपुष्पांजलिं समर्पयामि